NUTA BULLETIN
FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION
Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10
YEAR : 22 ) 18 th MAY, 1997 ( NO : 4

# वणी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना

***प्रा.बी.टी.देशमुख,*** *विधानपरिषद सदस्य.*

जवळ जवळ ३४ लक्ष रुपये त्यावेळच्या किमतीनुसार खर्च करून संपूर्णपणे बांधून झालेली एखाद्या **शहरासाठीची भुयारी गटार योजना** केवळ शासनाच्या विशिष्ट विभागाने सहकार्य न केल्यामुळे गेल्या १६ वर्षापासून बंद पडून आहे, असे सांगितले तर कुणाला ते खरे वाटणार नाही पण होय आजही कुलपबंद अवस्थेत अशी भुयारी गटारयोजना वणी या शहारामध्ये आपल्याला दिसून येईल. मुळात २८ मार्च १९६७ ला प्रशासकीय मान्यता मिळालेल्या वणी शहरासाठीच्या या भुयारी गटारयोजनेचे काम १९७१ साली सुरू झाले व ते १९७९ साली जवळ जवळ ३४ लक्ष रुपये खर्च करून पूर्ण झाले. **खरे म्हणजे घरगुती गटारलाईनची जोडणी भुयारी गटार योजनेला करण्याच्या कामाचा मुळ योजनेत समावेश असावयाला पाहिजे होता. पण तो तसा नसल्यामुळे योजना तयार झाल्यावर त्याबाबतीत वाद निर्माण झाला.** हे जोडणीचे काम नागरिकांनी किंवा नगरपालिकेने स्वखर्चाने करावे अशी भूमिका नगरविकास विभागाने घेतली व नगरपालिकेने योजना ताब्यात घ्यावी असा आग्रह चालविला. घरगुती गटारांची जोडणी न झालेली भुयारी गटार योजना ताब्यात घेवून नागरिकांना कोणताही लाभ होणार नव्हता व त्यामुळे नगरपालिकेने ही योजना ताब्यात घेण्यास स्पष्ट नकार दिला परिणामी तयार झाल्यादिवसापासून आजतागायत ही योजना बंद स्थितीत आहे.

२. १९९२ च्या दरम्यान विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या एका अधिवेशनांत त्या संघटनेचे एक पदाधिकारी श्री. पी.के.टोंगे यांनी ज्यावेळी ही माहिती मला सांगितली त्यावेळी मला खरोखरच आश्चर्य वाटले. श्री.पी.के.टोंगे हे त्यावेळी वणी शहराचे उपाध्यक्ष होते व त्या नात्याने शहराच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही त्यांच्याकडेच होता. नगराध्यक्ष या नात्याने ही भुयारी गटार योजना व त्या शहराची वाढीव पाणीपुरवठा योजना मार्गी लावण्यासाठी श्री.टोंगे यांनी बरीच मेहनत घेतल्याचे दिसून येते. याच संदर्भात वणी नगरपरिषदेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर एक याचिका (९५६/९१) दाखल केली होती. त्यावर **मा. उच्च न्यायालयाने "नगरपालिकेने शासनाकडे पाठविलेल्या निवेदनावर**

# १९९३ च्या पहिल्या अधिवेशनात "अंदाजपत्रके परिसर अभियांत्रिकी मंडळ, अकोला यांचेकडे तयार करण्यात येत आहेत." असे आश्वासन

**शासनाने योग्य निर्णय घ्यावा**" असे निदेश दिले होते.

३. मा. उच्च न्यायालयाच्या या निदेशामुळे पाणीपुरवठा योजना व भुयारी गटार योजना या दोनही बाबतीत नगरविकास विभागाच्या मा. उपमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात **मंत्रालयामध्ये एक बैठक २८ सप्टेंबर १९९२ रोजी बोलाविण्यात आली होती.** नगराध्यक्ष या नात्याने श्री.पी.के.टोंगे हे या बैठकीला उपस्थित होते. लोकप्रतिनिधी असे ते एकटेच बोलाविण्यात आले होते. इतर सर्व अधिकारीच या बैठकीला उपस्थित होते. श्री. टोंगे यांनी या बैठकीच्या कार्यवृत्तासह इतरही कागदपत्रांच्या प्रती माझेकडे सोपविल्या व या कामात मदत करावी अशी विनंती केली.

४. २८ सप्टेंबर १९९२ रोजी मंत्रालयामध्ये झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त मी काळजीपूर्वक वाचले तेंव्हा माझी अशी भावना झाली की मा. उच्च न्यायालयाच्या निदेशाचे अनुपालन करण्याची औपचारिकता पार पाडणे एवढ्याच एका हेतूने मा. उपमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक बोलाविण्यात आली होती. कारण या बैठकीची सुरुवातच "**यांचा प्रॉब्लेम काय आहे?**" अशा मा. उपमंत्र्यांच्या विचारणेने झाली. स्वतः उपमंत्रीच जेथे "**यांचा प्रॉब्लेम काय आहे?**" किंवा "**आपण आता काय करू शकतो?**" असे विचारत असतील तर मग तेथे अधिकारी सांगतील तसे तसे निर्णय होत जातात. "घरगुती गटार जोडणीचे काम नगरपालिकेने करावे" हा आग्रह अधिकाऱ्यांनी या बैठकीत सोडला नाही. या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या शेवटी "वणी भुयारी गटार योजनेचे रिवाईज एस्टीमेंट आणि रु. ५४ लाख किंम्मतीची पाणीपुरवठा योजना या दोन्ही योजनांची अंदाजपत्रके शासनाकडे ऑक्टोबर १९९२ अखेरपर्यंत आली पाहिजेत" असे ठरल्याचे नमूद आहे. हा धागा धरून वणीच्या दोनही योजनांचा पाठपुरावा करावा असे आम्ही ठरविले.

५. मुळात वणी हे 'ब' वर्ग नगरपालिका असलेले शहर असून शहराची १९९१ ची लोकसंख्या ४१९९२ होती. या शहरासाठी अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा केंद्राचा उद्भव "निरगुडा नदीवर हेड वर्क्स व ४ कूपनलिका" असा धरण्यात आलेला आहे. वणी शहराला होणारा दरडोई पाणी पुरवठा लक्षात घेता व नगरपालिकेची मागणी वितरण व्यवस्थेची असल्यामुळे संपूर्ण वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करण्याऐवजी फक्त वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे व शहराच्या ज्या भागामध्ये वितरण नलिका नाहीत अशा भागाकरिता वितरण नलिका पुरविणे व पाण्याची उंच टाकी व इतर किरकोळ कामे असलेली योजना तातडीने तयार करण्यात यावी अशी सतत मागणी केली जात होती. त्याच दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाने वणी शहराचे रस्ते रुंदी करण्याचे काम हाती घेतल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने नगर परिषद वणी यांना विनंती केली की सद्यःस्थिती मध्ये रस्त्याच्या बाजूला असलेली पाईपलाईन रुंदीकरणामुळे रस्त्याच्या मध्ये येण्याची शक्यता आहे, त्यामुळे आवश्यक असल्यास रोजच्या देखभालीच्या दृष्टीने मोठ्या व्यासाच्या पाईपलाईन

## वणी येथील वाढीव पाणीपुरवठा योजना व भुयारी गटार योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन-१९९३**

**गुरुवार, १८ मार्च १९९३**

(७) २५७६२ **सर्वश्री. पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, टी.एफ.पवार** सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. वणी नगराची भुयारी गटार योजना व ५४ लाख रुपये किमतीची वाढीव पाणी पुरवठा योजना यांच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे;

२. दिनांक २८ सप्टेबर १९९२ रोजी मंत्रालयामध्ये मा.उप-मंत्री नगरविकास यांच्या दालनामध्ये नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांशी उक्त विषयावर आयोजित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये याबाबत काही निर्णय घेण्यात आले, हे खरे आहे काय;

३. असल्यास, ते निर्णय कोणते व या निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय?

**श्री.अरुण गुजराथी :** (१) वणी नगराची अस्तित्वात असलेली भुयारी गटार योजना नगरपरिषद, वणीने ताब्यात न घेतल्यामुळे व नगरपरिषदेने घरगुती गटाराची जोडणी भुयारी गटार योजनेशी न केल्याने ही योजना कार्यान्वित झाली नाही व दिनांक १२ ऑगस्ट १९८२ पासून बंद स्थितीत आहे. सदर योजना दुरुस्त करून कार्यान्वित करण्याकरिता योजनेच्या दुरुस्ती अंदाजपत्रकातील तीन भागांपैकी पहिल्या भागाकरिता रु. २४.६० लाख किमतीची अंदाजपत्रके मंडळाने दिनांक ४ मार्च १९९३ रोजी शासनाकडे सादर केली आहेत. वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता अंदाजपत्रके परिसर अभियांत्रिकी मंडळ, अकोला यांचेकडे तयार करण्यात येत आहेत.

(२) होय

(३) निर्णय :-

(अ) भुयारी गटार योजना दुरुस्त करून घरगुती गटारांचे कनेक्शनकरिता निधी नगरपरिषदेने उपलब्ध करून द्यावा, त्याकरिता तीन झोन पाडून एका झोनचे (दाट वस्तीच्या) अंदाजपत्रक तयार करून शासनाकडे सादर करावे.

(ब) १०० कनेक्शन किंमत नगरपरिषदेने भरावी व त्याची जबाबदारी नगरपरिषदेची असेल.

(क) वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेची अंदाजपत्रके तयार करून शासनाकडे पाठवावी.

अंमलबजावणीची सद्यःस्थिती

(अ) वणी भुयारी गटार योजनेकरिता झोन क्रमांक १ चे दुरुस्ती रु. २४.६० लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक शासनाकडे प्राप्त झाले आहे. परंतु त्यामध्ये नगरपरिषदेचा योजना स्वीकृतीचा ठराव व नगरपरिषदेची आर्थिक स्थिती अहवाल प्राप्त झालेला नाही.

(ब) नगरपरिषदेने करावयाच्या १०० कनेक्शनकरिता अंदाजपत्रक नगरपरिषदेकडे मंडळाने ४ मार्च १९९३ रोजी पाठविले आहे.

(क) वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक अकोला मंडळ कार्यालयात तयार करण्यात येत आहे.


## नगर परिषद वणी जि. यवतमाळ

*फोन नं. २५०३१*

***कडून हार्दिक शुभेच्छा : स्थापना १९२४***

** शुद्ध पाणी पुरवठा   * वृक्षारोपन   * कर भरा !*

[illegible] — *अध्यक्ष*

[illegible] — *उपाध्यक्ष तथा सदस्यगण*

[illegible] — *मुख्याधिकारी*

# १९९३ च्या दुसऱ्या अधिवेशनात "अंदाजपत्रके नवीन दरसूचीनुसार महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळामार्फत करण्यात येत आहेत." असे शासनातर्फे उत्तर

टाकण्याचे काम रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यापूर्वी घ्यावे. उपरोक्त कारणामुळे नगरपालिकेकडून वितरण व्यवस्थेतील पाईपलाईन बदलण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबाबत वारंवार विनंती करण्यात येत होती. नगरपालिकेची वाढती मागणी लक्षात घेतल्यानंतर व विशेषतः पावसाळी अधिवेशनात दिनांक १५.७.९३ रोजी विधानपरिषदेत तारांकित प्रश्न क्र. २४४७६ ला जे उत्तर देण्यात आले त्याच्या पूर्ततेच्या अनुषंगाने रु. ६३.१८ लक्ष किंमतीचा प्रस्ताव, ज्यामध्ये आवश्यक त्या पाईपलाईन बदलण्याची कामे समाविष्ट आहेत, मुख्य अभियंता (ना) यांच्याकडे दि. १८.११.९३ च्या दरम्यान क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सादर केल्याचे दिसून येते. **सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार सन १९८२ च्या लोकसंख्येच्या आधारावर दांडेकर समितीने ठरविलेला या शहराचा अनुशेष ३.२५ दश लक्ष लिटर्स दर दिवशी इतका आहे.**

६. **राबविण्यात आलेली कायम स्वरूपी पाणी पुरवठ्याची मुळ योजना :** या शहरासाठी मुळ पाणी पुरवठा योजनेस त्यावेळच्या मध्यप्रदेश शासनाने : शासन निर्णय क्र. (मध्य प्रदेश शासन)/पिचई/९२३५/३८९०/१६/एक्सआयव्ही, दिनांक ३.१२.५४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. योजनेची किंमत त्यावेळला ५.८२ लक्ष रूपये होती. १९७९ सालीच्या ३०००० या संकल्पित लोकसंख्येसाठी बांधलेली ही योजना १९५८ मध्ये सुरू झाली त्यावेळी बांधलेल्या या योजनेच्या कामामध्ये पुढील उपागांचा समावेश होता :-

(१) इनटेक वेल निरगुडा नदीच्या पात्रात ६ फूट व्यासाची. (२) अनीकट - इनटेक वेलच्या खालच्या बाजूस दगडी बांधकाम (३) कनेक्टींग पाईप - ३८० मी.मी. १४.६० मी. लांब इनटेक वेल ते जॅकवेल (४) जॅकवेल व पंप हाउस - ४.५ मी. व्यास व ६ मी. खोल (५) अशुद्ध पाणी पंपीग मशीनरी - १५ हॉ. पॉवर टरबाईन पंप (६) उर्ध्व नलिका - ३०० मी.मी.व्यासाची एच.एस.पाईप ४०० मी. लांब (७) जलशुद्धीकरण केंद्र - क्षमता ३.३७५ द.ल.लि. (८) आर.सी.सी.संप १२३००० लि. क्षमतेची (९) ४० अश्वशक्तीचे सेंट्रफ्युगल पंप -२ (१०) ३०० मी. मी. व्यासाची एमएस पाईप उर्ध्वनलिका शुद्ध पाण्याकरिता ४२० मी. लांब पाण्याच्या उंच टाकीपर्यंत (११) पाण्याची उंच टाकी ६७५००० लि. (१२) वितरण व्यवस्था ८० मि.मि. ते ३०० मि.मि. व्यासाची लोखंडी पाईप एकूण ७११० मी. लांबी. (१३) सार्वजनिक नळ थांबे - २०० **सुधारित योजना** : दरवाढीमुळे योजना सुधारित करावी लागली. त्याला प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. एमडब्ल्यूएस/४४५८, दि. १४.१०.५९ अन्वये रू. ७.५५ लक्ष किमतीला देण्यात आली. सुधारित योजनेत मुळ योजनेप्रमाणे कामे करण्यात आलीत, नवीन कामे करण्यात आली नाही. नवीन उद्भव घेण्यात आला नाही. ३१.३.१९५९ ला सुधारित योजना पूर्ण झाली.

७. मुळातील योजना अपुरी पडायला लागल्याने **वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावाची** १९८१ च्या दरम्यान गरज वाटायला लागली या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दि. ३.४.८१ च्या (डब्ल्यूएसटी/२७८०/१९८/यूडी/१६, या) शासननिर्णयाने देण्यात आली. या योजनेची किंमत ४२.६९ लक्ष रूपये होती व सन २००६ सालची संकल्पित

### वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९३**

**गुरुवार दिनांक १५ जुलै १९९३**

(११) २८४७६ **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** तारांकित प्रश्न क्रमांक २५७६२ ला दिनांक १८ मार्च १९९३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील कायः-

१. वणी (जि. यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेची अंदाजपत्रके तयार होणे व प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;

२. प्रशासकीय मान्यता मिळाली असल्यास केव्हा व मिळालेली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अरुण गुजराथी :** (१) वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता वितरण व्यवस्थेची सुधारणा व नवीन पाण्याची टाकी, या कामाची अंदाजपत्रके नवीन दरसूचीनुसार महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळामार्फत करण्यात येत आहेत.

(२) योजना शासनास सादर झालेली नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

### वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९३**

सोमवार दिनांक १३ डिसेंबर १९९३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी,२७ डिसेंबर १९९३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली

(१७) ३१०७१ **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** तारांकित प्रश्न क्रमांक २८४७६ ला दिनांक १५.७. १९९३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील कायः-

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार होणे व प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;

(२) प्रशासकीय मान्यता मिळाली असल्यास केंव्हा, व मिळालेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अरुण गुजराथी :** (१) सदरहू बाबीची महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व शासनाकडे छाननी चालू आहे.

(२) योजना शासनाकडे आल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचा विचार करण्यांत येईल.

**पुजा एन्टरप्राइजेस, वणी जि. यवतमाळ**

*नगरपरिषद वणी जि. यवतमाळचे जकात अभिकर्ता*

**पार्टनर :- १. अशोक चिंडालिया, वणी २. विनोद लाल, वणी**

***आपल्या विशेषांकास मन:पूर्क शुभकामना !***

# १९९३ च्या तिसऱ्या अधिवेशनात "मंडळ व शासनाकडे छाननी चालू आहे." अशा प्रकारची शासनाने दिलेली माहिती

लोकसंख्या : ६०००० धरून ही योजना बांधण्यात आली होती. या योजनेतील प्रमुख उपकामे पुढील प्रमाणे :

(१) मुळ योजनेतील इनटेक वेलला जास्तीचे दोन रोज पिसेस बसविणे (२) अशुद्ध पाणी पंपींग मशीनरी ५० अश्वशक्तीचे नवीन पंप बसविणे (टरबाईन पंप) (३) २०० मी. मी. व्यासाची एम.एस.पाईप उर्ध्व नलिका ४५० मि. (४) ६.६७५ द.ल.लि. क्षमतेचे नवीन जलविद्युतीकरण केंद्र (५) १२५ अश्वशक्तीचे नवीन सेंट्रीफ्युगल पंप शुद्ध पाण्याच्या उपस्याकरीता (६) आरसीसी संप क्षमता २९५००० लि. पंपहाऊस सहीत (७) पाण्याची उंच टाकी : ११,३५,३०० लि. ८. वितरण व्यवस्था ८० मि.मि. ते ४०० मि.मि. व्यासाची पाईपलाईन (सी.आय.,एसी व पीव्हीसी पाईप) एकूण लांबी १४.३५ कि.मी. **सुधारित योजना** :- निरनिराळ्या कारणाने योजनेच्या कामास सुरुवात होण्यास दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी लागला व त्यामुळे झालेल्या दरवाढीमुळे योजना रु. ६१.०८ लक्ष किंमतीला सुधारित करावी लागली.

**८. प्रगतीपथावरील कायम स्वरूपी पाणी पुरवठा विद्यमान योजना** :- "वणी नागरी पाणी पुरवठा योजना वितरण व्यवस्थेत सुधारणा" असे प्रगतीपथावरील कायम स्वरूपी पाणीपुवठा योजनेचे स्वरूप असून या योजनेला प्रशासकीय मान्यता : महाराष्ट्र नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २३.११.९४ च्या शासननिर्णयाने देण्यात आलेली आहे. योजनेची किंमत : रु. ६३.१८ लक्ष असून आर्थिक वितरण : (१) १० टक्के लोकवर्गणी रु. ६.३१ लक्ष (२) ४० टक्के शासकीय अनुदान रु. २५.२७ लक्ष (३) ५० टक्के शासकीय अनुदान रु. ३१.५९ लक्ष वितरण व्यवस्थेत सुधारणा असे योजनेचे स्वरूप आहे. योजनेच्या उद्भव विस्ताराचे काम समाविष्ट नाही. प्रस्ताव फक्त वितरण व्यवस्थेचा आहे. योजनेतील समाविष्ट असलेली प्रमुख कामे पुढील प्रमाणे :- (१) २०० मी.मी. व्यासाची बीडाची पाईपलाईन वर्ग एल.ए.एकंदर ७८२३ मि. लांब (२) अस्तित्वात असलेल्या पाण्याच्या उंच टाकीची दुरुस्ती

९. अनुशेषांत असलेल्या शहरांना दरवर्षी पाण्याचा तुटवडा जाणवतो व विशेषतः उन्हाळ्यात तर ही रखरख मोठ्या प्रमाणात वाढते, परिणामी लोकांच्या असंतोषाला तोंड देतांना तातडीच्या पाणी पुरवठा योजना शासनाला घ्याव्या लागतात. अनुशेष नसलेल्या शहरांना अशा तातडीच्या पाणी पुरवठा योजनांची गरजच पडत नाही ही गोष्ट उघड आहे. १९८६ ते १९९३ या सात वर्षांच्या कालखंडात ५ तातडीच्या पाणीपुरवठा योजना वणी शहरासाठी घ्याव्या लागल्या त्या पुढीलप्रमाणे :-

(१) १९८६ साठी ११.२.८६ ला मंजूरी घेवून रु. ०.३० लक्ष सँड बॅग बंधारा काम (मंडळातर्फे) पूर्ण करण्यात आले. (२) १९८७ साली दिनांक २५.४.८८ मंजूरी मिळाल्यावर रु. २.८७ लक्ष किमतीची तातडीची योजना घेण्यात आली त्यात कूपनलिका विद्युत पंप व आवश्यक पाईप लाईन इत्यादी कामे न.प.तर्फे पूर्ण करण्यात आली) (३) १९९० रु. १.७६ लक्ष ०.७९ रूपये खर्च करून १५० मि.मि. व्यासाची खरबडा भागात एक कूपनलिका घ्यावी लागली योजना न.प.ने राबविली) (४) १९९२ साली दिनांक १२.२.९२ रोजी रु. ११.७३ लक्ष रूपये किमतीची तातडीची योजना घेण्यात आली त्यात १. जॅकवेल जवळील ट्युबवेलपासून २०० मि.मि. व्यासाची ९०६ मि. लांब (६ के.जी.) पी.व्ही.सी.पाईप लाईन ते शेतकरी मंदिरापर्यंत न.प.राबविण्यात आला. २. खरबडा भागातील

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन १९९४**

**शुक्रवार दिनांक १८ मार्च १९९४**

(२१) ३४०६८ **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** दिनांक २७ डिसेंबर १९९३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या १३ डिसेंबर १९९३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट असलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३१०७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींचे महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळ व शासनाकडे सुरू असलेल्या छाननीचे काम पूर्ण झाले आहे काय?

(२) असल्यास उक्त योजनेला प्रशासकीय मान्यता दिली असल्यास केंव्हा, नसल्यास याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**श्री. अरुण गुजराथी :** (१) नाही

(२) प्रशासकीय मान्यता देणे संदर्भात कार्यवाही सुरू आहे.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९४**

**मंगळवार दिनांक १२ जुलै १९९४**

(२५) ३८३३१ **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, नितीन गडकरी, वसंतराव मालधूरे :** तारांकित प्रश्न क्रमांक ३४०६४ ला दिनांक १८ मार्च १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकासमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बार्बीसंदर्भात महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळ तसेच शासनाच्या पातळीवर सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली ही गोष्ट खरी आहे काय?

(२) असल्यास उक्त योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय, दिली असल्यास केव्हा;

(३) नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय?

**श्री.अरुण गुजराथी :** (१) नाही

(२) नाही

(३) प्रस्तावाची छाननी सुरू आहे.


**शिक्षण प्रसारक मंडळ वणी जि. यवतमाळ संचलित**

***१. लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी*** *(कला, वाणिज्य व विज्ञान)*

***२. औषधीशास्त्र पदविका***

***३. एस.पी.एम. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वणी***

**श्री. वि.मा. मुकेवार** — *अध्यक्ष*
**श्री. ॲड अ.दि. देशपांडे** — *सचिव*
**श्री.सु.धो.देशमुख** — *उपाध्यक्ष*
*तथा सदस्यगण*
**श्री. रा.स.बलकी** — *सहसचिव*

कु.माया नालमवार, मुख्याध्यापिका मारेगांव, श्रीमती वेणूताई काटवले जि.प.सदस्या, मारेगाव मार्डी, श्री.व्ही.पी. पानट, शिक्षक वणी, श्री. नारायण राजूरकर, वणी, प्रा.रेखा गावंडे, वणी प्रा..पद्माकर ढुमे, वणी, श्री.बबनराव धकाते, वणी, कु.विमल घाटोळे, श्री.लींगण्णा, बेलोरा

* **न्यु विजय ट्रान्सपोर्ट, वणी**
* **तिरुपती गुडस् ट्रान्स्पोर्ट, वणी**
* **साई कोल वणी, प्रो. भरत ठाकूर**
* **रवि गॅस एजन्सी प्रो. रवी निरवार**
* **मधुर कोरिअर सर्व्हीसेस, वणी**
* **डॉ. पद्माकर मते, वणी**
* **साईकृपा एस.टी.डी/पी.सी.ओ. वणी**
* **मनोहर रेडीमेड स्टोअर्स वणी प्रो. मनोहर नागदेव**
* **प्रा. परशुराम आवारी, वणी**
* **हरिष कृषी केंद्र मारेगांव**

# १९९४ च्या पहिल्या अधिवेशनात "प्रशासकीय मान्यता देणे संदर्भात कार्यवाही सुरु आहे." अशा प्रकारची माहिती शासनातर्फे देण्यात आली

ट्युबवेल वरून ११० मी.मी.व्यासाची १००४ मी. लांबीची पाईपलाईन ३. वॉटर वर्क्सच्या मागे घेण्यात आलेल्या ट्युबवेलपासून ११ मि.मि. व्यासाची ९९२ मी. लांब पाईपलाईन. ४. ११० मि.मि. व्यासाची वरोरा रोड ते गोरकार लेआउट कडे ८२२ मी. पाईप लाईन (५) ११० मि.मि. व्यासाची पीव्हीसी ६८२.५५ मि. लांब पाईप लाईन (६) पाणबुडे पंप ट्युबवेल वर बसविणे २ (७) स्विचरूम ३ (८) शास्त्रीनगर भागातील ट्युबवेलचे काम पूर्ण व गौरकार भागात घ्यावयाच्या ट्युबवेलचे काम सुरू करावयाचे आहे. (५) १९९३ साली दिनांक १७.६.९३ रोजी रु. ५.६४ लक्ष किमतीची तातडीची योजना पुन्हा घ्यावी लागली त्यात १. ट्युबवेल १ २. २० अश्वशक्तीचे पंप १ ३. पाईपलाईन १००० मी. या कामांचा समावेश होता.

**१०.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **१९९३ च्या पहिल्या अधिवेशनांत** गुरुवार, दिनांक १८ मार्च १९९३ रोजी सर्वश्री. पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, टी.एफ.पवार यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २५७६२ हा उत्तरासाठी होता. " वणी नगराची भुयारी गटार योजना व ५४ लाख रुपये किमतीची वाढीव पाणी पुरवठा योजना यांच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे;" या प्रश्न भाग १ ला नगरविकास मंत्री श्री. अरुण गुजराथी यांनी "वणी नगराची अस्तित्वात असलेली भुयारी गटार योजना नगरपरिषद, वणीने ताब्यात न घेतल्यामुळे **व नगरपरिषदेने घरगुती गटाराची जोडणी भुयारी गटार योजनेशी न केल्याने ही योजना कार्यान्वित झाली नाही व दिनांक १२ ऑगस्ट १९८२ पासून बंद स्थितीत आहे.** सदर योजना दुरुस्त करून कार्यान्वित करण्याकरिता योजनेच्या दुरुस्ती अंदाजपत्रकातील तीन भागांपैकी पहिल्या भागाकरिता रु. २४.६० लाख किंमतीची अंदाजपत्रके मंडळाने दिनांक ४ मार्च १९९३ रोजी शासनाकडे सादर केली आहेत. वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता अंदाजपत्रके परिसर अभियांत्रिकी मंडळ, अकोला यांचेकडे तयार करण्यात येत आहेत." असे उत्तर दिले होते. "**दिनांक २८ सप्टेबर १९९२ रोजी मंत्रालयामध्ये मा.उप-मंत्री नगरविकास यांच्या दालनामध्ये नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांशी उक्त विषयावर आयोजित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये याबाबत काही निर्णय घेण्यात आले, हे खरे आहे काय?**" या प्रश्न भाग दोनला "होय" असे उत्तर देण्यात आले होते. कोणते निर्णय घेण्यात आले या प्रश्नाला

"**निर्णय** :- (अ) भुयारी गटार योजना दुरुस्त करून घरगुती गटारांचे कनेक्शनकरिता निधी नगरपरिषदेने उपलब्ध करून द्यावा, त्याकरिता

### वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९४**
**गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर १९९४**

(१३) ४०१६१ **सर्वश्री वसंतराव मालधूरे, नितीन गडकरी, अशोक मोडक, पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे :** तारांकित प्रश्न क्रमांक ३८३३१ ला दिनांक १२ जुलै १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकासमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बार्बीसंदर्भात महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या प्रस्तावाची शासनाच्या पातळीवर सुरू असलेली छाननीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय?

(२) असल्यास उक्त योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय, असल्यास केव्हा;

(३) अद्याप प्रशासकीय मान्यता दिलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री.अरुण गुजराथी :** (१) होय

(२) व (३) लवकरच प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

### वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५**
**गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट १९९५**

रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली बुधवार, दिनांक २ ऑगस्ट १९९५ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी प्रश्न क्रमांक (१२) १४२२

(१२) १४२२ **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** तारांकित प्रश्न क्रमांक ४०१६१ ला दिनांक २४ नोव्हेंबर १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

१. वणी (जि.यवतमाळ) शहराच्या अंदाजे ६३ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेला प्रशासकिय मान्यता देणारे शासनआदेश २३ नोव्हेंबर १९९४ रोजी निर्गमित करण्यात आले असून ही योजना १९९४-९५ च्या कृती कार्यक्रमामध्ये समाविष्ट करण्याचे निदेश महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळास शासनाने दिले हे खरे आहे काय?

२. खरे असल्यास मंडळाने या योजनेच्या कार्यपुर्तीचे काय नियोजन केलेले आहे,

३. अद्यापहि नियोजन झालेले नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मनोहर जोशी :** (१) नाही. तथापि, योजनेला मंजुरी देतांना योजनेचा समावेश आर्थिक कृती कार्यक्रमात करावा या अटीच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) ही योजना निधीच्या उपलब्धतेनुसार २ वर्षात पूर्ण करावयाचे नियोजन आहे. योजनेत प्रामुख्याने वितरण व्यवस्थेचा समावेश असून त्याकरिता आवश्यक पाईप्स मिळविण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.


**श्री. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था,**
**वणी जि. यवतमाळ संचलित** *फोन नं. २५४०४*
*१.औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वणी*
*२.औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मारेगांव*
*३.औषधी निर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रम मारेगाव*
**विनोद मोहितकार** — *अध्यक्ष*
**विश्वास नांदेकर** — *उपाध्यक्ष*
**ओमप्रकाशजी चचडा** — *सचिव*
*तथा इतर सदस्य गण*

**१. रामदेव बाबा मंदीर, वणी**
**२. रामदेव बाबा कुष्ठरोग उपचार केंद्र, राजूर**
**३.रामदेवबाबा मुक बधीर विद्यालय, चिखलगांव**

**Rajiv S. Pampattiwar**
*B.E. (Civil)*
* Govt Contractor * L.I.C. Panel Valuer * Charted Engineer
***JIVANCHAYA DESHMUKHWADI, WANI 445 304***
Tel - 07239 25775

# १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनात पुन्हा "प्रस्तावाची छाननी सुरू आहे." अशा प्रकारचे शासनातर्फे उत्तर

तीन झोन पाडून एका झोनचे (दाट वस्तीच्या) अंदाजपत्रक तयार करून शासनाकडे सादर करावे.

(ब) १०० कनेक्शन किंमत नगरपरिषदेने भरावी व त्याची जबाबदारी नगरपरिषदेची असेल.

(क) वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेची अंदाजपत्रके तयार करून शासनाकडे पाठवावी." असे उत्तर देण्यात आले होते व "या निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे? " या प्रश्नाच्या उत्तरात मा. नगरविकास मंत्र्यांनी असे नमूद केले होते की

"**अंमलबजावणीची सद्यःस्थिती** :- (अ) वणी भुयारी गटार योजनेकरिता झोन क्रमांक १ चे दुरुस्ती रु. २४.६० लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक शासनाकडे प्राप्त झाले आहे. परंतु त्यामध्ये नगरपरिषदेचा योजना स्वीकृतीचा ठराव व नगरपरिषदेची आर्थिक स्थिती अहवाल प्राप्त झालेला नाही.

(ब) नगरपरिषदेने करावयाच्या १०० कनेक्शनकरिता अंदाजपत्रक नगरपरिषदेकडे मंडळाने ४ मार्च १९९३ रोजी पाठविले आहे.

(क) वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक अकोला मंडळ कार्यालयात तयार करण्यात येत आहे. "

**११.** गुरुवार, दिनांक १८ मार्च १९९३ रोजीचे उपरोक्त उत्तर काळजीपूर्वक वाचले तर भुयारी गटार योजनेचा प्रश्न जवळ जवळ प्रतिकुलतेत गेला होता. या गोष्टीची कल्पना मला तीन चार दिवसापूर्वीच आली होती, ती श्री. पी.के.टोंगे यांच्या पत्रावरून. अधिवेशन सुरू असतांना वणी नगरपरिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती श्री. ओमप्रकाशजी चचडा यांचे सोबत प्रश्नोत्तराशी संबधीत काही कागदपत्रे श्री. टोंगे यांनी माझेकडे पाठविली होती. त्यासोबत लिहिलेल्या १५ मार्च १९९३ च्या पत्रात श्री. टोंगे यांनी असे कळविले होते की "ड्रेनेजबाबत शासनाचे पत्र प्राप्त झाले असून १६,८९,१०० रुपये १०० कनेक्शन जोडणीचा खर्च दाखविलेला आहे. एका संडास जोडणीचा खर्च १६,८९१ (सोळा हजार आठशे एक्क्याण्णव) रुपये येतो. हा खर्च भरण्यापेक्षा नागरिक सेप्टिक टँकचा संडास बांधणे स्वीकारतील. सोबत जोडलेले अंदाजपत्रक अवास्तव वाटते." सोबत जोडलेल्या शासनाच्या कागदपत्रामध्ये ही १०० जोडणीच्या कामाची किंमत १६,८९,१०० रुपये नमूद करण्यात आली होती.

**१२.** या भुयारी गटार योजनेची प्राक्कलने १९६६ साली तयार करण्यात आली. त्याला मुळात प्रशासकीय मान्यता २८ मार्च १९६७ ला १६.९५ लाख रुपये किमतीला देण्यात आली. भाववाढीमुळे पुढे सुधारित

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५**
**बुधवार दिनांक ९ ऑगस्ट १९९५**
***रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या चौथ्या यादीतील प्रश्न क्रमांक ४२४२६***

(१७) ४२४२६ (३१.१.९५) सर्वश्री **श्री.वसंतराव मालधूरे, श्रीमती संजीवनी रायकर, पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी वणी नगरपरिषदेच्या योजना स्वीकृतीचा ठराव वणी नगरपरिषदेची आर्थिक स्थिती दर्शविणारा स्थानिक लेखा निधी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय?

(२) असल्यास रु. ६३.१८ लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने मान्यता दिली आहे काय;

(३) असल्यास सदर योजनेच्या कामास प्रारंभ झाला आहे काय व या कामासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे?

**श्री. मनोहर जोशी** (१.६.९५) : (१) होय

(२) होय दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजी शासनाने या योजनेस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(३) नाही. कारण या योजनेच्या कामास प्रारंभ करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले वितरण व्यवस्थेचे पाईप्स अद्यापि उपलब्ध झालेले नाहीत. १९९५-९६ या आर्थिक वर्षात या कामासाठी एकूण रु. ३१.०० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

## वणी शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या बांधकामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९६**
**गुरुवार दिनांक १८ जुलै १९९६**

(२१) ८७७६ सर्वश्री **सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे :** गुरूवार दिनांक ३ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २ ऑगस्ट १९९५ च्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट असलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक १४२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजीच्या शासन निर्णयाने प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजे ६३ लाख रुपये ढोबळ किंमतीच्या वणी या "ब" वर्ग नगरपालिकेच्या कायमस्वरूपी वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या चालू असलेल्या बांधकामावर ३१ मार्च १९९६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात किती खर्च करण्यात आला आहे;

(२) या योजनेसाठी, वितरण व्यवस्थेसाठी आवश्यक असणारे पाईप्स मिळण्याबाबतच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व ही योजना केव्हापासून कार्यान्वित करण्यात येईल?

**श्री. अण्णा डांगे :** (१) सदर योजनेवर ३१ मार्च १९९६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात रू. २८.०९ लाख खर्च झाला आहे.

(२) या योजनेनुसार २०० मि.मी. व्यासाच्या बीडाच्या पाईपची ६,६०० मिटर पाईपची आवश्यकता असून आतापर्यंत २,७०० मी. पाईप्स प्राप्त झाले आहेत. उर्वरित ३,९०० मी. लांबीचे पाईप्सचे पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. पाईप्स उपलब्ध होताच योजना लवकरच कार्यान्वित करण्यात येईल.


**रमेश सुंकुरवार, वणी**
*शासकीय ठेकेदार*
*फोन : घर - २५४२७, ऑफीस- २५६०३*

**योगेश ट्रेडर्स, वणी**
*जि.यवतमाळ*
***प्रो. सुरेश खिवसरा***
*फोन : घर - २५५१७, ऑफीस- २५०२७*

**SALIM JANMOHAMMAD BHIWANI**
***Regd. Govt. Contractor***
Specialist in
*Phone - 25671*
* Earth Moving * R.C.C. Structure
Contact for * TATA HITACHI
* POCLAIN
* TIPPERS

# १९९४ च्या तिसऱ्या अधिवेशनात गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर १९९४ रोजी तारांकित प्रश्न व बुधवार दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजी प्रशासकीय मान्यतेचा शासननिर्णय निर्गमित

प्रशासकीय मान्यता (३४ लक्ष रुपये ढोबळ किमतीला) १३ ऑगस्ट १९७९ ला देण्यात आली. १९७१ मध्ये या योजनेच्या बांधकामाला सुरुवात झाली व ते काम १९७९ मध्ये पूर्ण करण्यात आले. या भुयारी गटार योजनेची बांधणी करतांना वणी शहराची ३ भागात विभागणी केली होती. या योजनेच्या बांधकामामध्ये :-

१. गटार पाईपलाईन्स व चेंबर्स (१८ इंच ते ६ इंच व्यासाच्या)

२. संप व पंप हाउस, पंपींग मशनरी (एकंदर ३) शहराची विभागणी ३ भागात करण्यात आली होती)

३. उर्ध्वनलिका : (१. पंपीग स्टेशन १ - १६ इंच बीडाची वर्ग एल.ए.५४७० फूट लांब

२. पंपींग स्टेशन २ - ८ इंच बीडाची वर्ग, एल.एस. २०२४ फूट

३. पंपींग स्टेशन ३ - ८ इंच बीडाची वर्ग ए. ३१८५ फूट)

४. ऑक्सीडेशन पाँड

या चार उपांगांच्या बांधकामाचा मुख्यत्वेकरून योजनेमध्ये समावेश होता.

## वणी (जि. यवतमाळ) वितरण व्यवस्थेत सुधारणा योजनेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता व अनुदानास मंजुरी

**महाराष्ट्र शासन *नगरविकास विभाग* शासन निर्णय क्रमांक : पापुयो १०९३/१४००/प्र.क्र.२००/नवि-३०**

***मंत्रालय, मुंबई४०० ०३२, दिनांक : २३ नोव्हेंबर, १९९४***

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे पत्र क्र. डब्ल्यूएसटी- १०८६/८१५/प्र.क्र. ३६६/भाग-२/प्रशाना-४/६९४४, दिनांक २५.११.९३ २. क्रमांक डब्ल्यूएसएस-१०८६/८१५/प्र.क्र.३६६/प्रशाना-४, दिनांक ६.७.१९९४

**निर्णय :-** वणी (जि. यवतमाळ) वितरण व्यवस्थेत सुधारणा योजनेच्या महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाने तयार केलेल्या रु. ६३,१८,०५८/- ढोबळ (१७.५ टक्के आस्थापना व सयंत्रे खर्चासह) किंमतीच्या नकाशे व अंदाजपत्रके यांना खालील अटींच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे योजनेच्या ढोबळ किंमतीच्या ४० टक्के म्हणजेच रु. २५,२७,२२३/-(रुपये पंचवीस लक्ष सत्तावीस हजार, दोनशे तेवीस फक्त) अनुदान देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(अ) वणी नगरपरिषदेने लोकवर्गणीची रक्कम रु. ६, ३१,८०६/- च्या १/३ रक्कम महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाकडे भरल्याशिवाय योजनेची कामे हाती घेण्यात येऊ नयेत. लोकवर्गणीची रक्कम नगरपरिषदेने वार्षिक तीन हप्त्यात भरणे आवश्यक आहे.

(ब) आता मंजूर केलेले अनुदान रोख द्यावयाचे नसून योजनेच्या कामाची जसजशी प्रगती होत जाईल त्याप्रमाणे योजनेच्या प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर समायोजित करावयाचे आहे. त्यामुळे मंडळाला उपयोजन प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही.

(क) योजना स्वयंसंतुलीत होण्यासाठी नगरपरिषदेने पाणीपट्टीत जरूर ती वाढ केली पाहिजे. त्याप्रमाणे योजनेवर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न याचा हिशेब स्वतंत्रपणे ठेवावा.

(ड) वणी नगरपरिषदेने आर्थिक परिस्थिती सुधारण्याबाबत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या दिनांक ३.२.१९९४ रोजी झालेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत शासनाची खात्री करावी.

(इ) आयुर्विमा महामंडळाचे व खुल्या बाजारातील कर्ज रु. ३१,५९,०२९/-आणि त्यावरील व्याज व हप्त्याची परतफेड सर्वसाधारण सभेच्या दिनांक ३.२.९४ रोजी झालेल्या ठराव क्रमांक १०/१ प्रमाणे त्यांची अंमलबजावणी नियमित केली जाईल. याबाबत नगरपरिषदेने दक्षता घ्यावी.

(ई) ही योजना सन १९९४-९५ च्या मंडळाच्या वार्षिक कृती कार्यक्रमात अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

(उ) या योजनेवर मंजूर केलेल्या आर्थिक आकृतीबंधात बदल झाल्यास तो या योजनेस लागू होईल.

(ऊ) ही योजना पूर्ण झाल्यानंतर ती राबविण्यासाठी शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळणार नाही.

२. वणी ही "ब" वर्गीय नगरपरिषदेची योजना म्हणून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळातर्फे राबविण्यात येईल. व ती पूर्ण होताच नगरपरिषदेला हस्तांतरित करण्यात येईल. या योजनेचा आर्थिक आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

१. योजनेची ढोबळ किंमत रु. ६३,१८,०५८
(१७.५ टक्के आस्थापना व सयंत्रे खर्चासह)

२. शासकीय अनुदान ४० टक्के रु. २५,२७,२२३

३. कर्ज ५० टक्के रु. ३१,५९,०२९

४. लोकवर्गणीची रक्कम १० टक्के रु. ६,३१,८०६

३. वणी वाढीव सुधारित पाणी पुरवठा योजनेचा खर्च मागणी क्र. एफ-५ लेखाशिर्ष "२२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१, पाणी पुरवठा राज्य योजना (४१) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिःसारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (२२१५००७९)" या खाती खर्ची घालावा आणि त्या अनुदानातून भागवावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.. विअप्र-१०९२/प्र.क्र.११३ /९२/विनिमय, दिनांक १.६.९२ मधील अनुक्रमांक ५ नियम क्र. २७ (२) नुसार विभागास प्रदान केलेल्या प्रशासकीय व वित्तीय अधिकारानुसार सचिव, नगरविकास यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

**(प्र.तु.बगाडे)**
कार्यासन अधिकारी

**श्री. गणेश ऑईल मिल**
***वणी जि. यवतमाळ***
**फोन -** मील - २५१४९, २५१६९ : घर - २६२६९
*शुद्ध तेल व अनाजके विक्रेता*

***आर.व्ही. उंबरकर***
*फोन नं. २५५३५ शासकीय ठेकेदार, वणी*

* विरोजी टॉकीज, वणी * साई चुना, वणी * हॉटेल शालीमार, जुना बस स्टँड वणी * प्रो. हरपाल केशनाणी * नगर परिषद रोजंदारी कामगार श्रमिक संघ, वणी * नगर परिषद कर्मचारी कामगार संघटना, वणी

**नगर परिषद वणी सन ८५-८६ ते ९०-९१ :** १. श्री.वि.मा.मुकेवार, अध्यक्ष २. श्री.म.ना.साधनकर, उपाध्यक्ष, ३. श्री. वसिम अहेमद, उपाध्यक्ष ४. श्री. युनुसभाई सलाट, उपाध्यक्ष ५. श्री. म.क.चिंडालिया ६. श्री.जानमहंमद भिवाणी ७. श्री. अ.ल.नालमवार ८. श्री. पारसमल कोठारी ९. श्री.प.मो.देशपांडे १०. श्री.ओ.ह.चचडा ११. श्री.पी.के.टोंगे १२ श्री. ग.मु बोरडे १३. श्री.ब.रा.तिरामकर १४. श्री.ना.क.बाचीकवार १५. सौ. विमल भोंगळे १६. सौ.प्रभा देहाटे १७. श्री. शा.उ.निरवार १८. श्री.सु.ज.रायपुरे १९. श्री.ग.म.वाघाडे २०. श्री.सुरेश आसमवार २१.प्रा. अनिल हूड २२. श्री.अरुण गगशेट्टीवार २३. श्री.शा.चं. कुचेवार २४. श्री.वि.सं. येमुलवार २५. श्री.बा.स.पाटील २६. श्री. बा.धो.लोणारे २७. श्री.दुर्गाजी तोमस्कर २८. श्री. प्र.सु.ताराचंद २९. श्री. श.स.तडसे ३०. सौ.भा.चि. कपले ३१. श्री. म.मु.भंडारी ३२. श्री.मु.घे.जैन ३३. श्री.प्र.वि.कोंडावार

***श्रीमती सुलोचना महादेवराव कातकडे***
*जिल्हा परिषद सदस्या, चिखलगांव ता.वणी*
***सदस्या,***
*समाज कल्याण समिती जिल्हा परिषद, यवतमाळ.*

* **श्री.अजय थेरे, शासकीय ठेकेदार, वणी**
* **श्री.विजय गंधेवार, न.प.ठेकेदार, वणी**
* **श्री. अशोक पेचे, न.प.ठेकेदार वणी**
* **प्रो. शामरावजी निरवार**
* **शाम स्टोअर्स, वणी**

# १९९७ च्या दुसऱ्या अधिवेशनात योजना "२ वर्षात पूर्ण करावयाचे नियोजन आहे." असे शासनातर्फे आश्वासन

३४ लाख रुपये किमतीच्या या भुयारी गटार **योजनेचे ५ वे उपांग म्हणून "मुख्य गटार पाईप लाईनला घरगुती गटार लाईनची जोडणी"** या बांधकामाचा समावेश त्यावेळी केला असता तर आणखी ४-५ लाख रुपये जादा खर्च येवून योजना पूर्ण होताच १९८० मध्ये शहराला या योजनेचा लाभ मिळू शकला असता. **लाखो रुपयाच्या योजना बांधायच्या पण निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे त्या योजनांची "उच्च प्रतीची गुणवत्ता" तपासून पहाण्याची पहिली संधी सुद्धा लोकांना मिळता कामा नये असा अंगभूत बंदोबस्त करून ठेवण्याच्या "राजमान्य पद्धतीचा " जबरदस्त फटका वणी शहराच्या या भुयारी गटारी योजनेला बसला.** जलसिंचनासाठी कालवे व चऱ्यांचे काम हे प्रकल्पाचा भाग असते, हे कळण्यासाठी जशी पाटबंधारे विभागात फार मोठ्या बुद्धिवंताची गरज नाही तसेच घरगुती गटार लाईन मुख्य गटार लाईनला जोडली जात नसेल तर त्या शहराची भुयारी गटार योजना निरर्थक होते हे कळण्याएवढी बुद्धी त्यावेळी नगरविकास विभागात कोणाला नव्हती असे मानण्याशिवाय आज गत्यंतर उरले नाही.

**१३.** आज या भुयारी गटार योजनेला उकरून काढतो म्हटले तर त्यावेळचे बुद्धिवंत हे सेवा निवृत्त झालेले असतील व नव्या दमाचे नगरविकास विभागातील नवे गडी "आंगापेक्षा बोंगा मोठा" चा प्रयोग दुरुस्तीसाठी केल्याशिवाय रहायचे नाहीत, नव्हे तसे उत्तर त्यांनी सभागृहातच दिलेले आहे. १६ वर्षापासून बंद असलेल्या या भुयारी गटार योजनेचे प्रत्येक उपांग आता नादुरुस्त झालेले आहे. गटाराची पाईपलाईन, चेंबर्स, संपवेल, पंप, पंपहाउस, उर्ध्वनलिका, ऑक्सीडेशन पाँड इत्यादी सर्व नादुरुस्त असून २८ सप्टेंबर १९९२ च्या नगराध्यक्षाबरोबर झालेल्या मंत्रालयातील बैठकीत ठरल्याप्रमाणे शहराच्या तीन झोनपैकी वणी गटार योजना झोन क्र. १ ची दुरुस्तीची अंदाजपत्रके विभागाने तयार केली. या योजनेतील

## वणी नागरी पाणी पुरवठा योजना
## अ. सर्व साधारण माहिती

१. शहराचे नांव : वणी
२. नगरपालिकेचे वर्गीकरण : "ब" वर्ग
३. अनुशेष : होय. यादीत समाविष्ट
४. लोकसंख्या : १९९१ - ४१९९२, सध्याची (१९९३) ४३०००
५. अस्तित्वातील पाणी पुरवठा केंद्राचा उद्‌भव व क्षमता

**अ.अद्‌भव :**
१ निरगुंडा नदीवर हेड वर्क्स
२. कूपनलिका ४

**ब. केंद्राची क्षमता :**
१. मुळ योजनेतील ३.३७५ एमएलडी
२. वाढीव योजनेतील ६.६७५ एमएलडी
एकूण १० एमएलडी

६. पाणीपुरवठा योजना चालविणारी संस्था : पूर्ण ठेव तत्त्वावर मंडळातर्फे
७. ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपरिषदेमध्ये : मुळ योजना नगरपालिकेचीच म्हणून राबविण्यात आली.
८. पाणी पुरवठ्याचे प्रमाण :
१ नेहमीचे : ११० लि. दरडोई
२. उन्हाळ्यात : १०५ लि. दरडोई
३. मापदंडाप्रमाणे : १४० लि.दरडोई
९. आरक्षण : या शहराकरिता आरक्षण प्रस्ताव तयार करण्यात आलेला नाही.
१०. अनुशेष : सन १९८२ च्या लोकसंख्येच्या आधारावर दांडेकर समितीने ठरविलेला अनुशेष : ३.२५ द.ल.लि.

## *वणी नागरी पाणी पुरवठा योजना*
## ब. राबविण्यात आलेल्या कायम स्वरूपी पाणी पुरवठा योजना मुळ योजना

१. प्रशासकीय मान्यता : शासन निर्णय क्र. (मध्य प्रदेश शासन)/ पिचई/९२३५/३८९० /१६/एक्सआयव्ही, दिनांक ३.१२.५४
२. तांत्रिक मंजुरी : पिएचई (एमपी) नागपूर/३२५६/टी/पीएच, दि. २३.६.५५
३. योजनेची किंमत : रु. ५.८२ लक्ष
४. पाणी पुरवठ्याचा दर : १५ गॅलन
५. संकल्पित लोकसंख्या : १९७९ - ३००००
६. योजना सुरू झाल्याचा दिनांक : १९५८
७. योजनेची उपकामे :
   १. इनटेक वेल निरगुंडा नदीच्या पात्रात ६ फूट व्यासाची.
   २. अनीकट - इनटेक वेलच्या खालच्या बाजूस दगडी बांधकाम
   ३. कनेक्टींग पाईप - ३८० मी.मी. १४.६० मी. लांब इनटेक वेल ते जॅकवेल
   ४. जॅकवेल व पंप हाउस - ४.५ मी. व्यास व ६ मी. खोल
   ५. अशुद्ध पाणी पंपीग मशीनरी - १५ हॉ. पॉवर टरबाईन पंप
   ६. उर्ध्व नलिका - ३०० मी.मी.व्यासाची एच.एस.पाईप ४०० मी. लांब
   ७. जलशुद्धीकरण केंद्र - क्षमता ३.३७५ द.ल.लि.
   ८. आर.सी.सी.संप १२३००० लि. क्षमतेची
   ९. ४० अश्वशक्तीचे सेंट्रफ्युगल पंप -२
   १०. ३०० मी. मी. व्यासाची एमएस पाईप उर्ध्वनलिका शुद्ध पाण्याकरिता ४२० मी. लांब पाण्याच्या उंच टाकीपर्यंत
   ११. पाण्याची उंच टाकी ६७५००० लि.
   १२. वितरण व्यवस्था ८० मि.मि. ते ३०० मि.मि. व्यासाची लोखंडी पाईप एकूण ७११० मी. लांबी.
   १३. सार्वजनिक नळ थांबे - २००
८. सुधारित योजना :
   १. प्रशासकीय मान्यता व प्रस्तावाची किंमत : शासन निर्णय क्र.एमडब्ल्यूएस/४४५८,दि. १४.१०.५९ रू. ७.५५ लक्ष
   २. योजना सुधारित करण्याची कारणे : दरवाढीमुळे योजना सुधारित करावी लागली.
   ३. सुधारित योजनेत समाविष्ट कामे : मुळ योजनेप्रमाणे कामे करण्यात आलीत, नवीन कामे करण्यात आली नाही.
   ४. सुधारित योजनेचा उद्‌भव : नवीन उद्‌भव घेण्यात आला नाही.
९. योजना पूर्ण झाल्याचा दिनांक : ३१.३.१९५९


वसंत जिनिंग अॅड प्रेसिंग फॅक्टरी, वणी
फोन २५११४ दादासाहेब नांदेकर, अध्यक्ष
नथ्थु पा. किन्हेकार, उपाध्यक्ष * सुधिर दामले, सचिव
***लोक विकास शिक्षण संस्था, वणी***
*अध्यक्ष, नेताजी राजगडकर, माजी आमदार*
**सिमा झेरॉक्स, सुपर मार्केट, वणी फोन २५५०४**
[illegible]
रंगनाथ नागरी सहकारी संस्था, वणी
भैयाजी पांपट्टीवार,अध्यक्ष अरुण गंगशेट्टीवार, सचिव
श्रीमती वीजयाताई नालमवार उपाध्यक्ष
लिंगा रेड्डी कृषी सेवा केंद्र वणी फोन २५३७८

**नगरपरिषद वणी सन १९९१-९२ ते ९६-९७** १. श्री.शा.भ.ठाकरे अध्यक्ष २. श्री.पी.के.टोंगे उपाध्यक्ष (दोन वर्ष अध्यक्षाचा प्रभार) ३. श्री.एस.एन.देरकर अध्यक्ष ४. श्री.पी.यू. कोठारी, उपाध्यक्ष ५. श्री.डॉ.अ.ल.नालमवार उपाध्यक्ष ६. श्री.वि.दे.होले ७. श्री.वि.दे.काकडे ८. श्री. शमीम अहेमद ९. श्री.श्री.प्र.ग.बोंगीरवार १०. श्री.अ.ग.धुगुल ११. श्री.प्र.मो.देशपांडे १२. अशोक भेले १३. श्री.वि.मा.मुकेवार १४. श्री.श.म.क्षिरसागर १५. श्री.ओ.ह.चचडा १६. श्री.शा.उ.निरवार १७. श्री.न.रा.चवरे १८. श्री.ग.तू.सहारे १९. श्री.कि.छ.खुंगर २०. श्री.वा.भि.गाडगे २१. श्री.सु.ज.रामपुरे २२. श्री.सु.प.गोदानी २३. श्री.वि.भा.मोहितकर २४. श्री.ग.वि.सुंकुरवार २५. श्री.पा.रा.लांजेवार २६. श्री.वसिम अहेमद २७. श्रिमती आशाताई टोंगे २८. श्रीमती आशाताई कोराटे २९. श्रीमती कनिज अख्तर ३०. श्रीमती सोनाबाई बंडे ३१. श्रीमती जीजाबाई देठे ३२. श्रीमती इरफानाबानो ३३. श्रीमती नादेरुनिस्सा ३४. श्रीमती पुष्पाताई आत्राम ३५. श्रीमती संगीता भंडारी ३६. श्रीमती विद्याताई गंघवार ३७. श्री.ब.रा.तिरोनकर ३८. श्रीमती गिताबाई बिलोरिया
**शमीम अहेमद सभापती, नियोजन समिती न.प.वणी**

**सुनिल वरारकर सभापती, प्रकाश कराड उपसभापती प.स.वणी. मदन नायगावकर, श्रीमती कल्पना सदानंद झाडे वणी एस.पी.झाबक, क्रॉन्ट्रक्टर, वणी फोन २५१५७ - ग्रामिण विकास संस्था नायगाव (बु) र.न. ३५०५** अध्यक्षा श्रीमती वैदेही नामगांवकर - **गोयनका बिछायत केंद्र, वणी - श्री. मोहनसिंग ताराचंद, वणी - श्री. ताराचंदजी बोहरा ठेकेदार वणी - श्री. अशोक धुगुल सरपंच ग्रा.प.नवरगाव** *तथा सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती* - श्री.विश्वंभरजी झाम, सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती, वणी - **कृषी उत्पन्न बाजार समिती, वणी बापुराव पा.पानघाटे,** सभापती माजी आमदार श्री. ढुमने सचिव - पुजा गॅस एजन्सी महागॅस डीलर, वणी जि.यवतमाळ फोन २५२०२ प्रो. दिनेश बतरा अंबरराव घरोटे, वणी

# १९९५ च्या दुसऱ्या अधिवेशनात "१९९५-९६ या आर्थिक वर्षात या कामासाठी एकूण रु. ३१.०० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे." असे आश्वासन

सर्व उपांगे १६ वर्षापासून बंद स्थितीत असल्यामुळे झोन क्र. १ मधील सर्व बंद असलेल्या पुढील उपांगाचा दुरुस्ती अंदाजपत्रकात समावेश करण्यात आला होता :-

"१. अ. गटार पाईपलाईन्स व चेंबर्स गाळ काढून स्वच्छ करणे व दुरुस्ती

२. पंपगृह दुरुस्ती

३. ४०० मि.मि. व्यास बीडाची उर्ध्ववाहिनी दुरुस्ती

४. पंपींग मशनरी दुरुस्ती

५. ऑक्सीडेशन पॉंड दुरुस्ती"

हे दुरुस्तीचे अंदाजपत्रक २४.५९ लाख रुपयाचे तयार करण्यात आले. १८ मार्च १९९३ रोजी सभागृहात मा. नगरविकास मंत्र्यांनी स्पष्टपणे आपल्या उत्तरात असे नमूद केले होते की, "सदर योजना दुरुस्त करून कार्यान्वित करण्याकरिता योजनेच्या दुरुस्ती अंदाजपत्रकातील तीन भागांपैकी पहिल्या भागाकरिता रु. २४.६० लाख किंमतीची अंदाजपत्रके मंडळाने दिनांक ४ मार्च १९९३ रोजी शासनाकडे सादर केली आहेत." तीन झोनपैकी एका झोनच्या दुरुस्तीचा खर्च जवळ जवळ २४-२५ लाख रुपये. त्याशिवाय या एकाच झोनमधील १०० कनेक्शन जोडणीचा १६ लाख रुपये खर्च नागरिकांनी किंवा नगरपरिषदेने करावयाचा. आता एका झोनचा हा खर्च ४०-४१ लाख रुपये होणार म्हणजे तीन झोनचा खर्च १ कोटी रुपयाच्या वर जाणार. हिंदीतील प्रसिद्ध हास्यकवी श्री सुरेंद्र शर्मा यांच्या चार ओळी मला आठवल्या

एक डाक्टर हरियाणा के जाट से कह रहो है
रे जाट तेरी जाटणी बहुतही सिरियस है
पंधरासौ रूपयामे बिलकुल ठीक हो जावेगी
जाट बोले "रे डाक्टर रहणे दे
पांचसौ मे तो नयी जाटणी आ जावे"

यातील विनोदाचा व चेष्टेचा भाग सोडून दिला तरी "रिपेअरी रिन्युएल से महेंगी पडेगी तो कौन करेगा?"

**१४.** भुयारी गटार योजना पुनरुज्जीवनाच्या प्रस्तावाचा पाठपुरावा सोडून देण्याशिवाय गत्यंतरच राहिले नव्हते. सत्यशोधन समितीने वणी शहराचा नागरी पाणीपुरवठ्याचा दरदिवशीचा अनुशेष ३२.५ लक्ष लिटर्स निश्चित केला होता. हे लक्षात घेता निदान पाणीपुरवठा योजनेचा तरी

### *वणी नागरी पाणी पुरवठा योजना*
### वाढीव पाणी पुरवठा योजना

१. प्रशासकीय मान्यता : डब्ल्यूएसटी/२७८०/१९८/यूडी/१६, दि. ३.४.८१
२. तांत्रिक मान्यता : एमडब्ल्यूएसएसबी/डब्ल्यू/एसटी/२७८०/१९८१/यूडी/२०, दि. ११.८.८१
३. योजनेची किंमत : रु. ४२.६९ लक्ष (२१ऽईटीपी)
४. पाणी पुरवठ्याचा दर : १४० लि. दरडोई
५. संकल्पित लोकसंख्या : ६०००० (२००६)
६. योजना सुरू केल्याचा दिनांक : २/१९८२
७. योजनेतील उपकामे :
  १. मुळ योजनेतील इनटेक वेलला जास्तीचे दोन रोज पिसेस बसविणे
  २. अशुद्ध पाणी पंपींग मशीनरी ५० अश्वशक्तीचे नवीन पंप बसविणे (टरबाईन पंप)
  ३. २०० मी. मी. व्यासाची एम.एस.पाईप उर्ध्व नलिका ४५० मि.
  ४. ६.६७५ द.ल.लि. क्षमतेचे नवीन जलविद्युतीकरण केंद्र
  ५. १२५ अश्वशक्तीचे नवीन सेंट्रीफ्युगल पंप शुद्ध पाण्याच्या उपस्याकरीता
  ६. आरसीसी संप क्षमता २९५००० लि. पंपहाऊस सहीत
  ७. पाण्याची उंच टाकी : ११,३५,३०० लि.
  ८. वितरण व्यवस्था ८० मि.मि. ते ४०० मि.मि. व्यासाची पाईपलाईन (सी.आय.,एसी व पीव्हीसी पाईप) एकूण लांबी १४.३५ कि.मी.

८. सुधारित योजना :- योजनेच्या कामास सुरुवात होण्यास दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी लागला व त्यामुळे झालेल्या दरवाढीमुळे योजना रु. ६१.०८ लक्ष किंमतीला सुधारित करावी लागली.

### *वणी नागरी पाणी पुरवठा योजना*
### क. प्रगतीपथावरील कायम स्वरूपी पाणी पुरवठा योजना

१. योजनेचे नाव : वणी नागरी पाणी पुरवठा योजना वितरण व्यवस्थेत सुधारणा
२. प्रशासकीय मान्यता : नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. पापुयो /१०९३/१४००/प्रक्र.२००/नवि-३०, दिनांक २३.११.९४
३. तांत्रिक मान्यता : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळाचे पत्र क्र. डब्ल्यूएसएस/१०८६/८१५/सीआर-३६६/प्रशाना-४/१७ दि. १.१.९५
४. योजनेची किंमत : रु. ६३.१८ लक्ष
५. आर्थिक वितरण :
  १. १० टक्के लोकवर्गणी रु. ६.३१ लक्ष
  २. ४० टक्के शासकीय अनुदान रु. २५.२७ लक्ष
  ३. ५० टक्के शासकीय अनुदान रु. ३१.५९ लक्ष
६. योजनेचे स्वरूप : वितरण व्यवस्थेत सुधारणा
७. योजनेचा उद्भव : उद्भव विस्ताराचे काम समाविष्ट नाही. प्रस्ताव फक्त वितरण व्यवस्थेचा आहे.
८. दरडोई पाणी पुरवठा : ११० लि. दरडोई
९. योजनेतील समाविष्ट कामे :
  १. २०० मी.मी. व्यासाची बीडाची पाईपलाईन वर्ग एल.ए.एकंदर ७८२३ मि. लांब
  २. अस्तित्वात असलेल्या पाण्याच्या उंच टाकीची दुरुस्ती

* माजी आमदार, बापुराव पानघाटे * श्री.नंदकिशोर चचडा, सदस्य कृषि उत्पन्न बाजार समिती वणी
* श्री.अतुल जैस्वाल, कॉन्ट्रक्टर, वणी
* श्री.एम.के.सहारकर, आरोग्य निरीक्षक, न.प.वणी
* श्री.दिलीप चिंडालिया, ठेकेदार, वणी
* श्री.एस.एस.महांगडे, ठेकेदार, वणी * श्री.शिवकुमार जोनलवार, ठेकेदार, वणी * श्री.जंगलूजी कुईटे, ठेकेदार, वणी * श्री.एन.के.तराळे, कनिष्ठ अभियंता, न.प.वणी * मे. जोरावरमल रूपचंद ॲन्ड सन्स, वणी बर्तन के व्यापारी

**नगरपरिषद वणी सन १९९६-९७ ते २००१ - २००२**
१.श्री.अ.छ.पटेल, अध्यक्ष २. श्री.र.वा.येरणे, उपाध्यक्ष ३. श्री.न.चं.भंडारी ४. श्री.ध.र.भोंगळे ५. श्री.प्र.मा.निळूरे ६. स.रा.वैद्य ७. श्री.सु.मो.खिवसरा ८. श्री.कि.ह.खुंगर ९. श्री.ओ.ह.चचडा १०. श्री.प्र.मो.देशपांडे ११. श्री.सु.ह.राजगडकर १२. श्री.सं.वा.वाघमारे १३. श्री.सु.ज.रामपुरे १४. श्री.य.व.निमकर १५. सतिश तोटावार १६. श्री.स.नि.देरकर १७. श्री. पी.के.टोंगे १८. श्रीमती आशाताई टोंगे १९. श्रीमती शालीनीताई रासेकार २०. श्रीमती शाबुबी अ. अजीज २१. श्रीमती लिलाबाई इंगळे २२. श्रीमती निर्मलाताई प्रेमलवार २३. श्रीमती छाया निंदेकर २४. श्रीमती अनुसया पाटील २५. कु.ज्योती मेश्राम

* Well Wisher वणी * रिझलॅक (बजाज पाईप) नागपूर ।विरेंद्रकुमार कुंदनलाल जैस्वाल, वणी * माहेर कापड केंद्र, वणी * अशोक ट्रेडर्स जैन स्थानक जवळ, वणी जि. यवतमाळ वितरक - ब्रिटानिया, डाबर, रावलगांव, हिमानी, इमामी इत्यादी * धनगर समाज संघटना, वणी मारेगांव तालुका* कन्हैया जनरल स्टोअर्स, वणी * यासिम भाई * अशोक येरणे * वहिद भाई

**शामराव नक्षणे** *फोन २५४५२*
*शासकीय ठेकेदार वणी*

# १९९६ च्या दुसऱ्या अधिवेशनात "सदर योजनेवर ३१ मार्च १९९६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात रू. २८.०९ लाख खर्च झाला आहे." अशी शासनातर्फे माहिती देण्यात आली

जबरदस्त पाठपुरावा करावा असे आम्ही ठरविले व त्यानंतरच्या प्रत्येक अधिवेशनांत प्रशासकीय मान्यता मिळेपर्यंत आम्ही हा प्रश्न सातत्याने लावून धरला.

**१९९३ च्या दुसऱ्या अधिवेशनात** "वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती" या विषयावरील सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २८४७६ हा गुरुवार दिनांक १५ जुलै १९९३ रोजीच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये उत्तरासाठी होता. "वणी (जि. यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेची अंदाजपत्रके तयार होणे व प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्नाला नगरविकास मंत्री श्री. अरुण गुजराथी यांनी "वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता वितरण व्यवस्थेची सुधारणा व नवीन पाण्याची टाकी, या कामाची अंदाजपत्रके नवीन दरसूचीनुसार महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळामार्फत करण्यात येत आहेत." असे उत्तर दिले होते. "विलंबाची कारणे काय आहेत?" या उपप्रश्नाच्या उत्तरात "**योजना शासनास सादर झालेली नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.**" असे नमूद करण्यात आले होते.

१५. **१९९३ च्या तिसऱ्या अधिवेशनात** सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३१०७१ च्या उत्तरामध्ये सुद्धा शासनाने "सदरहू बाबीची महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण **मंडळ व शासनाकडे छाननी चालू आहे....** योजना शासनाकडे आल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचा विचार करण्यांत येईल." असे नमूद केले होते.

१६. **१९९४ च्या पहिल्या अधिवेशनांत** पुन्हा याच विषयावरील सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४०६८ हा शुक्रवार दिनांक १८ मार्च १९९४ रोजी उत्तरासाठी होता "वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींचे महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण **मंडळ व शासनाकडे सुरू असलेल्या छाननीचे काम पूर्ण झाले आहे काय?" या प्रश्न भाग १ ला "नाही"** असे उत्तर देण्यात आले होते. मात्र पुढे "**प्रशासकीय मान्यता देणे संदर्भात कार्यवाही सुरू आहे.** " असे उत्तरात नमूद केले होते.

१७. १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनात पुन्हा मंगळवार दिनांक १२ जुलै १९९४ रोजी याच विषयावरील आमचा तारांकीत प्रश्न क्रमांक ३८३३१ हा उत्तरासाठी होता "वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींसंदर्भात महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण **मंडळ तसेच शासनाच्या पातळीवर सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली ही गोष्ट खरी आहे काय?**" या प्रश्न भाग १ ला शासनातर्फे "**नाही**" असे उत्तर देण्यात आले होते. "नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय?" या प्रश्न भाग ३ ला "**प्रस्तावाची छाननी सुरू आहे.**" असे उत्तर देण्यात आले होते.

१८. पुन्हा **१९९४ च्या तिसऱ्या अधिवेशनात** गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर १९९४ रोजी आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ४०१६१ हा उत्तरासाठी होता. नागपूरात अधिवेशन होते. ३२.५ लक्ष लिटर्स दरदिवशीचा पिण्याच्या पाण्याचा अनुशेष असलेल्या वणी सारख्या 'ब' वर्ग नगरपालिकेचा प्रश्न. त्यात पुन्हा १९९३ च्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या तसेच १९९४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनांत लागोपाठ सतत यापूर्वी प्रश्न आलेला. आता १९९४ च्या तिसऱ्या अधिवेशनात तो पुन्हा परत आलेला. "अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहेत", "अंदाजपत्रके नवीन दरसुचीनुसार करण्यात येत आहेत", "मंडळ व शासनाकडे छाननी सुरू आहे", "छाननीचे काम अजून पूर्ण झालेले नाही", "प्रशासकीय मान्यता देणे संदर्भात कार्यवाही सुरू आहे" "प्रस्तावाची छाननी सुरू आहे." अशी मोघम व टाळाटाळीची

## *वणी नागरी पाणी पुरवठा योजना*
## ड. टंचाई काळात घेण्यात आलेल्या उपाय योजनांचा तपशील

अ.नं. वर्ष मंजुरीचा दिनांक योजनेची किंमत योजनेवर झालेला खर्च प्रस्तावातील कामे

१. १९८६ ११.२.८६ रु. ०.३० लक्ष सँड बॅग बंधारा काम पूर्ण (मंडळातर्फे)

२. १९८७ २५.४.८८ रु. २.८७ लक्ष कूपनलिका विद्युत पंप व आवश्यक पाईप लाईन (न.प.तर्फे काम पूर्ण करण्यात आले) (आमदार फंडातून)

३. १९९० रु. १.७६ लक्ष ०.७९ १५० मि.मि. व्यासाची खरबडा भागात एक कूपनलिका (योजना न.प.ने राबविली)

४. १९९२ १२.२.९२ रु. ११.७३ लक्ष रु. ११.७३ लक्ष **(१)** जॅकवेल जवळील ट्युबवेलपासून २०० मि.मि. व्यासाची ९०६ मि. लांब (६ के.जी.) पी.व्ही.सी.पाईप लाईन ते शेतकरी मंदिरापर्यंत न.प.राबविण्यात आला **(२)** खरबडा भागातील ट्युबवेल वरून ११० मी.मी.व्यासाची १००४ मी. लांबीची पाईपलाईन **(३)** वॉटर वर्क्सच्या मागे घेण्यात आलेल्या ट्युबवेलपासून ११ मि.मि. व्यासाची ९९२ मी. लांब पाईपलाईन. **(४)** ११० मि.मि. व्यासाची वरोरा रोड ते गोरकार लेआउट कडे ८२२ मी. पाईप लाईन **(५)** ११० मि.मि. व्यासाची पीव्हीसी ६८२.५५ मि. लांब पाईप लाईन **(६)** पाणबुडे पंप ट्युबवेल वर बसविणे २ **(७)** स्विचरूम ३ **(८)** शास्त्रीनगर भागातील ट्युबवेलचे काम पूर्ण

५. १९९३ १७.६.९३ रु. ५.६४ लक्ष **(१)** ट्युबवेल १ **(२)** २० अश्वशक्तीचे पंप १ **(३)** पाईपलाईन १००० मी. काम पूर्ण व्हायचे आहे. न.प.प्रस्ताव


**व्यापारी मंडल, वणी**
**जि.यवतमाळ**
**अध्यक्ष** - ओमप्रकाशजी खुराणा
**सचिव** - मुन्ना तुगनायत **उपाध्यक्ष** - निरथ अग्रवाल
**कोषाध्यक्ष** - नारायण देवडे
**सदस्य** -
जब्बार चिनी, नंदकिशोर चचडा, सुरेंद्र लाल, बलदेव खुंगर, अनुप खत्री बबन जोबनपुत्रा, अशोक बोथरा
**मोरेस्वर पावडे, डॉ.भा.भा.कावडे सदस्य,**
सभापती, कृषि व पशुसंवर्धन जि.प. यवतमाळ

**इंदीरा सहकारी सूत गिरणी**
**म. वणी**
*र.नं. YTL/PRG-7/93 (सरकार मान्य)*
***अध्यक्ष***
***मा. वामनराव कासावार***
*आमदार, वणी*

**ग्रामपंचायत मारेगांव (कोरंबी)**
***रमेश भोंगळे, सरपंच बबन काळे, उपसरपंच***

| ग्रामपंचायत | सरपंच | उपसरपंच | सचिव |
|---|---|---|---|
| कायर | आर.पी.गोनलावार | एम.आर.वाघाडे | आयडी बोथपांगे |
| चिखलगांव - | एन.के.कातकडे | सौ.आर.बी.औतकर | बी.पी.गोहोकार |
| शिरपूर | जी.बी.बोंडे | एम.एन.सोमाम | डब्ल्यु.जे डाखरे |
| धोन्सा- | डी.जे.काकडे, | के.झेड कोटरंगे | डी.डी.कोसे |
| रासा - | श्रीमती पी.बी.येरगुंडे | व्ही.पी.खारकर | बी.एस.घोपटे |
| विरखुंड - | श्रीमती आ.डी.सोयाम | एसडी.लखमापुरे | व्ही.डी.उपसंचीवार |
| नांदेपेरा - | ' ' व्ही.एस.डुमोरे | वाय.आर.खामनकर | आर.जी.आसेकर |
| राजुर - | श्रीमती यु.आर.फुलझेले | ए.बी.भगत | पी.सी.गोफने |

**उद्दीष्टे :**
१. कर वसुली १०० टक्के करणे २. पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे ३. ग्रामिण शौचालय ४. पतपुरवठा

# १९९७ च्या पहिल्या अधिवेशनात "मे १९९७ पर्यंत काम पूर्ण होऊन या वाढीव वितरण व्यवस्थेमधून पाणी पुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे." असे उत्तर

उत्तरे किती दिवस द्यायची? याचा पुढे पुढे उत्तर देणाराला सुद्धा संकोच होतो.

**१९.** सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या साधारणपणे २५-३० मिनिटे अगोदर आम्ही काही सभासद सभागृहात स्थानापन्न होतो. दिवसभराच्या कामकाजाची खणातील कागदपत्रे अभ्यासून काढण्यासाठी हा २५-३० मिनिटांचा वेळ खूपच चांगला व शांततेचा असतो. २४ नोव्हेंबर १९९४ रोजी असेच आम्ही तयारी करीत बसलो. वणीच्या प्रश्नाचे लेखी उत्तर पाहिले तर ते मन खिन्न करणारे होते. "वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींसंदर्भात महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या प्रस्तावाची **शासनाच्या पातळीवर सुरू असलेली छाननीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय?** " या प्रश्न भाग १ ला "**होय**" असे उत्तर देण्यात आले होते. प्रश्न भाग २ व ३ च्या एकत्रित उत्तरात "**लवकरच प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.**" असे नमूद करण्यात आले होते. सभागृहाची बैठक सुरू होण्याच्या ५-७ मिनिटे अगोदर नगरविकासमंत्री श्री. अरुण गुजराथी हे सभागृहामध्ये आले. आल्याआल्याच माझ्याकडे पाहून त्यांनी गंमतीने फाईलसह दोनही हात वर करून नमस्कार करीत "अहो बी.टी. आता वणीच पाणी दाखवू नका. एखाद्या अधिवेशनात तर विश्रांती घेत चला. सतत तुमचे प्रश्न चालूच आहेत" असे बोलत ते आमच्या जवळ आले व म्हणाले " मी काल ब्रिफींगच्या वेळी माझ्या अधिकाऱ्यांना सांगितले. लाईटली घेवू नका. बी.टीं.चा प्रश्न आहे आणि प्रत्येक अधिवेशनात ते तो लावत आहेत. मोघम उत्तरे किती दिवस द्यायची? आजच्या आज शासननिर्णय निर्गमित झाला पाहिजे."

"आताच माझ्याकडे शासननिर्णयाच्या प्रति आल्या आहेत." असे म्हणत त्यांनी त्यांच्या नस्तीवरील शासननिर्णयाची एक जादा प्रत मला दिली. "**वणी (जि. यवतमाळ) वितरण व्यवस्थेत सुधारणा, योजनेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता व अनुदानास मंजुरी**" या शीर्षकाच्या महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने निर्गमित केलेल्या "शासन निर्णय क्रमांक : पापुयो १०९३/१४००/प्र.क्र.२००/नवि-३० मंत्रालय, मुंबई४०० ०३२, दिनांक : २३ नोव्हेंबर, १९९४" या शासननिर्णयाची ती प्रत होती. मी नगरविकास मंत्र्यांचे मनापासून आभार मानले. सांसदिय आयुधांच्या वापरातून मिळालेल्या या यशाने मला खरोखरीच आनंद झाला होता. 'बेल' सुरू झालेली होती. सभागृहाची बैठक व प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला. हा प्रश्न तेराव्या क्रमांकावर असल्यामुळे त्याच्यावर अनुपुरक चर्चा होवू शकली नाही. लेखी उत्तर तसेच राहीले. शासननिर्णय निर्गमित झाला होता. संसदिय आयुधांचा बारकाईने वेध घेणाऱ्या माझ्या सारख्या अभ्यासकाला एक नवा धडा मिळाला होता. "तारांकित प्रश्नोत्तरे" व "अतारांकित प्रश्नोत्तरे" या आयुधांच्या प्रश्न सोडवून घेण्याच्या शक्तीमध्ये निश्चितपणे फरक असतो, हे खरे असले तरी "वेळेअभावी अतारांकित झालेला मुळचा तारांकित" प्रश्न सुद्धा किती उपयुक्त ठरू शकतो, याचे प्रत्यक्ष दर्शन या प्रकारातून मला झाले. चर्चेला मुळीच येण्याची शक्यता नसलेला अतारांकित प्रश्न, निश्चितपणे अनुपुरक चर्चेसाठी येणारा तारांकित प्रश्न यांच्यातील प्रभाव शक्तींचा फरक लक्षात येणे सहजशक्य आहे, पण चर्चेला येण्याची शक्यता आहे (खात्री नसली तरी) असा प्रश्न केवळ या शक्यतेमुळे सुद्धा (वेळेअभावी पुढे अतारांकित झाला तरी) कसे यश मिळवून जातो याचे प्रात्यक्षिकच मला यानिमित्ताने पहायला मिळाले.

**२०.** प्रशासकीय मान्यतेच्या शासननिर्णयाची प्रत आम्हाला मिळाली नसती तर किंवा असा शासननिर्णय निर्गमित झालेला आहे याची माहिती नसती तर पुढच्या अधिवेशनामध्ये असा "शासननिर्णय निर्गमित झाला हे खरे आहे काय?" अशा अर्थाचा प्रश्न आम्ही विचारला असता पण आता शासननिर्णय निर्गमित झाल्यामुळे या योजनेच्या बांधकामाचा पाठपुरावा करणे हे अपरिहार्य काम झाले.

**२१. १९९५ च्या दुसऱ्या अधिवेशनांत** निरनिराळ्या दोन वेळा हा प्रश्न सभागृहासमोर आला. बुधवार दिनांक २ ऑगस्ट १९९५ रोजी तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये १२ व्या क्रमांकावर समाविष्ट असलेला सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १४२२ हा त्यादिवशीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये होता पण एका सदस्याने दुसऱ्या सदस्याला "पायरीने वागा" म्हटल्याच्या प्रकरणावरून सभागृहात त्यादिवशी खूपच गोंधळ झाला व कोणतेहि कामकाज होवू न शकल्यामुळे त्या दिवशीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

"वणी (जि.यवतमाळ) शहराच्या अंदाजे ६३ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेला प्रशासकिय मान्यता देणारे शासनआदेश २३ नोव्हेंबर १९९४ रोजी निर्गमित करण्यात आले असून ही योजना १९९४-९५ च्या कृती कार्यक्रमामध्ये समाविष्ट करण्याचे निदेश महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळास शासनाने दिले हे खरे आहे काय?" या प्रश्न भाग १ ला मा. मुख्यमंत्र्यांनी "नाही. तथापि, योजनेला मंजुरी देतांना योजनेचा समावेश आर्थिक कृती कार्यक्रमात करावा या अटीच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे." असे उत्तर दिले होते. "खरे असल्यास मंडळाने या योजनेच्या कार्यपुर्तीचे काय नियोजन केलेले आहे?" या प्रश्न भाग २ च्या उत्तरामध्ये मा. मुख्यमंत्र्यांनी असे नमूद केले होते की, "**ही योजना निधीच्या उपलब्धतेनुसार २ वर्षात पूर्ण करावयाचे नियोजन आहे. योजनेत प्रामुख्याने वितरण व्यवस्थेचा समावेश असून त्याकरिता आवश्यक पाईप्स मिळविण्याची कार्यवाही सुरू आहे.**"

**२२. याच अधिवेशनामध्ये ३१ जानेवारी १९९५** रोजी विचारलेल्या आमच्या प्रश्न क्रमांक ४२४२६ या अतारांकित झालेल्या प्रश्नाला मा. मुख्यमंत्र्यांनी १ जून १९९५ रोजी दिलेले लेखी उत्तर **बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट १९९५** रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौथ्या यादीमध्ये समाविष्ट होते. "सदर योजनेच्या कामास प्रारंभ झाला आहे काय व या कामासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे?" या प्रश्न भाग दोन ला "नाही. कारण या

## वणी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन-१९९७**
**शनिवार, दिनांक १२ एप्रिल १९९७**

(२) १५५६८ **सर्वश्री बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, व्ही.यु.डायगव्हाणे** तारांकित प्रश्न क्रमांक ८७७६ ला दिनांक १८ जुलै १९९६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाणीपुरवठा मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :

१. २३ नोव्हेंबर १९९४ रोजीच्या शासननिर्णयाने प्रशासकिय मान्यताप्राप्त, अंदाजे ६३ लाख रूपये ढोबळ किमतीच्या, वणी या "ब" वर्ग नगरपालीकेच्या कायमस्वरुपी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या चालू असलेल्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे?

२. या योजनेचा भाग असलेल्या विविध उपकामाच्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे?

३. सदरहू प्रकल्पाच्या कार्यपूर्तीचे व त्यातून शहराला पाणीपुरवठा सुरू करण्याचे काय नियोजन करण्यात आलेले आहे?

**श्री. अण्णा डांगे :** (१) योजनेअंतर्गत लागणारे पाईप्स प्राप्त झाले असून पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. व टाकलेल्या पाईपची दाब चाचणी सुरु आहे.

(२) या योजनेअंतर्गत जुन्या टाकीची दुरुस्ती व वितरण व्यवस्था अशी कामे अंतर्भूत असुन टाकीच्या दुरूस्तीची कामे पूर्ण झाली असून वितरण व्यवस्थेचे काम सुरु आहे.

(३) मे १९९७ पर्यंत काम पूर्ण होऊन या वाढीव वितरण ~~व्यवस्थेमधून पाणी पुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे.~~

योजनेच्या कामास प्रारंभ करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले वितरण व्यवस्थेचे पाईप्स अद्यापि उपलब्ध झालेले नाहीत. **१९९५-९६ या आर्थिक वर्षात या कामासाठी एकूण रु. ३१.०० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे." असे उत्तर देण्यात आले होते.**

२३. **ऑगस्ट १९९५ च्या विधानपरिषदेच्या अधिवेशनांत ३ ऑगस्ट १९९५ व ९ ऑगस्ट १९९५ रोजी** या प्रश्नाबाबतची जी उत्तरे शासनातर्फे देण्यात आलेली होती ती काळजीपूर्वक पाहिली तर त्यामध्ये **"ही योजना निधीच्या उपलब्धतेनुसार २ वर्षात पूर्ण करावयाचे नियोजन आहे." "१९९५-९६ या आर्थिक वर्षात या कामासाठी एकूण रु. ३१.०० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे."** ही दोन महत्वपूर्ण आश्वासने देण्यात आली होती. योजनेला प्रशासकीय मान्यता मिळणे, ती मिळाल्यावर निधी उपलब्ध होणे, तो उपलब्ध झाल्यावर कोणत्याही अडथळ्याशिवाय काम सुरू रहाणे व ठरलेल्या वेळेत ठरलेला निधी खर्ची होणे यावर लक्ष ठेवत सतत पाठपुरावा करणे हा सर्व स्तरावरच्या लोकप्रतिनिधींच्या कामाचा एक महत्वाचा व अविभाज्य असा भाग असतो.

२४. या पाठपुराव्याचा भाग म्हणून **१९९६ च्या दुसऱ्या अधिवेशनातील** आमच्या तारांकित प्रश्न क्रमांक ८७७६ वर नमूद झालेली प्रश्नोत्तरे नमुना म्हणून पहाण्यासारखी आहेत. गुरुवार, दिनांक १८ जुलै १९९६ रोजी विचारण्यात आलेल्या "दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजीच्या शासन निर्णयाने प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजे ६३ लाख रुपये ढोबळ किंमतीच्या वणी या "ब" वर्ग नगरपालिकेच्या कायमस्वरूपी वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या चालू असलेल्या बांधकामावर ३१ मार्च १९९६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात किती खर्च करण्यात आला आहे?" या प्रश्न भाग १ ला पाणीपुरवठा मंत्र्यांनी **"सदर योजनेवर ३१ मार्च १९९६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात रू. २८.०९ लाख खर्च झाला आहे."** असे उत्तर दिले होते तर "या योजनेसाठी, वितरण व्यवस्थेसाठी आवश्यक असणारे पाईप्स मिळण्याबाबतच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व ही योजना केव्हापासून कार्यान्वित करण्यात येईल?" या प्रश्न भाग २ च्या उत्तरामध्ये "या योजनेनुसार २०० मि.मी. व्यासाच्या बीडाच्या पाईपची ६,६०० मिटर पाईपची आवश्यकता असून आतापर्यंत २,७०० मी. पाईप्स प्राप्त झाले आहेत. उर्वरित ३,९०० मी. लांबीचे पाईप्सचे पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. पाईप्स उपलब्ध होताच योजना लवकरच कार्यान्वित करण्यात येईल." असे नमूद करण्यात आले होते. १९९५-९६ या आर्थिक वर्षामध्ये ३१ लाख रुपये खर्च करण्याचे नियोजन होते व त्याप्रमाणे जवळ जवळ तेवढा त्या आर्थिक वर्षात झालेला होता. शिवाय योजना लवकर कार्यान्वित होईल असे आश्वासनही देण्यात आले होते.

२५. "वणी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाची सद्यःस्थिती " या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक १५५६८ हा शनिवार, दिनांक १२ एप्रिल १९९७ रोजी उत्तरासाठी होता. " २३ नोव्हेंबर १९९४ रोजीच्या शासननिर्णयाने प्रशासकिय मान्यताप्राप्त, अंदाजे ६३ लाख रूपये ढोबळ किमतीच्या, वणी या "ब" वर्ग नगरपालीकेच्या कायमस्वरुपी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या चालू असलेल्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे? " या प्रश्न भाग १ ला मा. पाणीपुरवठा मंत्र्यांनी "योजनेअंतर्गत लागणारे पाईप्स प्राप्त झाले असून पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. व टाकलेल्या पाईपची दाब चाचणी सुरु आहे." असे उत्तर दिले होते. " या योजनेचा भाग असलेल्या विविध उपकामांच्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे?" या प्रश्न भाग २ च्या उत्तरात "या योजनेअंतर्गत जुन्या टाकीची दुरुस्ती व वितरण व्यवस्था अशी कामे अंतर्भूत असुन टाकीच्या दुरूस्तीची कामे पूर्ण झाली असून वितरण व्यवस्थेचे काम सुरु आहे." असे नमुद करण्यात आले होते. "सदरहू प्रकल्पाच्या कार्यपूर्तीचे व त्यातून शहराला पाणीपुरवठा सुरू करण्याचे काय नियोजन करण्यात आलेले आहे?" या तिसऱ्या उपप्रश्नाला उत्तर देतांना मंत्रिमहोदयांनी **"मे १९९७ पर्यंत काम पूर्ण होऊन या वाढीव वितरण व्यवस्थेमधून पाणी पुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे."** असे नमुद केले होते. प्रत्यक्ष मे (१९९७) महिन्यात योजना कार्यान्वित होणार असल्याने हा उन्हाळा वणीकरांना बराच सुसह्य होईल अशी अपेक्षा करू या.

२६. सद्यःस्थितीमध्ये शहराला होणाऱ्या पाणी पुरवठ्याचा उद्भव पुरेसा असल्यामुळे उद्भव विस्ताराची आवश्यकता नसली तरी शहरातील उंच भागातील वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा, नवीन वस्तीकरिता वितरण व्यवस्था, आवश्यकता वाटल्यास पाण्याची उंच टाकी इत्यादी कामांचा समावेश असलेला प्रस्ताव प्रसंग विशेषी तयार करावा लागेल.

- ***प्रा.बी.टी.देशमुख,** विधानपरिषद सदस्य.*


**ऋणनिर्देश**

यवतमाळ जिल्ह्यातील वणी या ब वर्ग नगरपालिकेच्या हद्दीतील लोकांची पाण्याची तहान भागविण्यासाठीही पुरेसे पाणी उपलब्ध होऊ नये असा या शहराचा नागरी पाणी पुरवठा अनुशेष! आणि या समस्येचे सांगोपांग विश्लेषण करणारा नुटा बुलेटीनचा हा विशेषांक !!

हा विशेषांक प्रकाशित करण्यासाठी आवश्यक असलेले बळ उभारण्यात ज्यांनी सक्रिय सहकार्य दिले त्या .... श्री. पी.के.टोंगे माजी उपाध्यक्ष, श्री. विजयभाऊ मुकेवार, माजी अध्यक्ष, श्री. संजय देरकर, माजी अध्यक्ष, श्री. अरूण पटेल, अध्यक्ष, श्री. ओमप्रकाशजी चचडा माजी सभापती, श्री. शमीन अहेमद, माजी सभापती श्री. रायपुरे माजी सभापती, श्री. पाळवदे साहेब, श्री. नक्षणे ठेकेदार, श्री. सतीश तोटावार, श्री. सुरेश खिवसरा, श्री. सुरेश आसमवार, श्री. अशोक चिंडालीया, व प्रा. कारखानीस यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य आम्हाला मिळाले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

हस्ते परहस्ते, प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे विधानपरिषदेतील या चर्चा कानावर आल्यानंतर या अंकाच्या प्रकाशनासाठी आग्रहपूर्वक प्रयत्न करणाऱ्या नुटाच्या घाटंजीस्थित संघटक समितीचे अध्यक्ष प्रा. महाजन प्राचार्य अनिल हूड, प्रा. आस्वले व प्रा. एनगंटीवार ह्या विशेषांक प्रकाशन समितीच्या सदस्यांचा ऋणनिर्देश करणे त्यांनाहि आवडणार नाही पण त्यांच्या धडपडीचा निर्देश तर केलाच पाहिजे.

**-ए.जी.सोमवंशी,**
संपादक, नुटा बुलेटीन



**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER : Prof. V.K. Pande,**7,Yeshwant Appartments Laxmi Nagar,**WARDHA-442 001.** Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 83 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **18- 05 - 1997**


**if Undelivered please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

-----------------------------------------------------------------
--

To,.......................................................................

.............................................................................

.............................................................................